छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणे

सत्यमेव जयते

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्तसंस्था)

सारथी

Email ID : md.sarthi@maharashtra.gov.in | CIN :U74999PN2018NPL177394 | Website: https://sarthi-maharashtragov.in

मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी, समाजाच्या उमेदवारांसाठी सुवर्ण संधी

एम.फिल. (M.Phil) / पिएच.डी (Ph. D) साठी UGC - RGNF प्रमाणे अधिछात्रवृत्ती (Fellowship) करिता सारथीचा अभिनव उपक्रम

भारतातील एक दर्जेदार संशोधन, प्रशिक्षण आणि मानवी विकास संस्था म्हणून जडण-घडण करणे आणि उपरोक्त लक्षित गटाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी विविध संशोधन, प्रशिक्षण, मानव विकास व इतर कार्यक्रम हाती घेणे व त्यासाठी पात्र उमेदवारांना एम् फिल, डॉक्टरेट, पोस्ट-डॉक्टरेट अशा व इतर विविध उच्च शिक्षणासाठी लक्षित गटातील विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती देणे, हा सारथीचा प्रमुख उद्देशांपैकी एक आहे. सारथीच्या उपरोक्त अद्वितीय उपक्रमाचा फायदा घेण्यासाठी महाराष्ट्राच्या उपरोक्त लक्षित गटातील उमेदवारांना चांगली संधी आहे.

एम.फिल (M.Phil) / पीएच.डी.(Ph.D) या उच्च शिक्षणासाठी संशोधन करणाऱ्या उपरोक्त समाजाच्या विद्यार्थांकडून 'अधिछात्रवृत्ती (Fellowships) अधिछात्रवृत्तीसाठी मोठ्या प्रमाणात अर्ज यावेत अशी अपेक्षा आहे.

छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, सयाजी राव गायकवाड, महात्मा जोतिराव फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. पंजाबराव देशमुख, गुरुवर्य बाबुराव गणपतराव जगताप, संत गाडगेबाबा, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, अहिल्यादेवी होळकर, बहिणाबाई चौधरी यांनी आयुष्यभर केलेले संघर्ष, दिलेले तत्वज्ञान सर्वांना प्रेरणादायी आहे. त्यांच्या जीवनाचा आदर्श व त्यांनी दिलेले तत्वज्ञानामुळे संपूर्ण मानव समाज उपकृत आहे. त्यांच्या विचारांचे प्रतिबिंब भारताच्या संविधानाच्या मुलभूत तत्वांमध्ये दिसते. त्यांना आदरांजली म्हणून त्यांच्या स्मरणार्थ सारथी'' ने त्यांच्या नावाने उपरोक्त समाजाच्या पात्र उमेदवारांसाठी पुढील प्रमाणे अधिछात्रवृत्ती सुरू केली आहे.

Sr. No. — Name of the Fellowship to the Target Group for pursuing M.Phil / Ph.D.

A – Fellowship for all eligible candidates of the Target Group

1 छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती

[Chhatrapati Shivaji Maharaj National Research Fellowship (CSMNRF)] : Total No. of Fellowships this year :- 50
50% Fellowships Reserved for women & 3% Reserved for Divyangjan (Persons with Disability) candidates of the Target Group

शौर्य, पराक्रम, लढाऊ बाणा असणारे छत्रपती शिवराय ! माणसातील गुण शोधुन, संधी देणारे गुणग्राहक.. विलक्षण नेतृत्व ! मावळयांचा आत्मविश्वास, जनतेची सेवा, मनामनांत उजळलेला राष्ट्रभक्तीचा अग्नि ! छत्रपती शिवाजी महाराज- अलौकिक, अद्वितीय, अतुलनीय ऊर्जा ! अठरापगड जातींना एकत्र करुन, स्वराज्याच्या निर्मितीसाठी नवा हुंकार देणारे स्फुर्तिस्थान. गुणांची कदर करणारे, प्रज्ञावंत, शीलवंत, छत्रपती ! मराठी आरमाराचे निर्माते, जनतेच्या, रयतेच्या कल्याणासाठी कठोर कधी, तर कधी आपुलकीने न्याय निवाडा करणारे प्रशासक ! छत्रपतींच्याच विचारांची, इतिहासाची, रुजविलेल्या सर्व धर्मसमभावाची नाती. बुध्दीची धार, तळपती राहो ;शिवरायांचे स्मरण, अंतरी वाहो, राष्ट्राभिमान अन् सेवावृत्ती . . . अभिवादनांसह. . . ही अधिछात्रवृत्ती !

छत्रपती शिवाजी महाराजांनी आदर्श शासनव्यवस्थेची घडी बसविताना रयतेच्या हिताला नेहमीच प्राधान्य दिले. स्वराज्यातील, तसेच शत्रूंच्या स्त्रियांचाही त्यांनी योग्य तो आदर ठेवला आणि त्यांना सन्मानाने वागविले. त्याचबरोबर स्त्रियांवर अन्याय, अत्याचार करणाऱ्यांची त्यांनी कधीच गय केली नाही. त्यांचा इतिहास जसा शौर्याचा, धैर्याचा आहे तसाच औदार्याचादेखील आहे. त्यांनी रणांगण गाजविले, त्याचबरोबर आदर्श शासन प्रणालीचा अवलंब केला . त्यांचे राज्य केवळ एका जातिधर्माचे नव्हते. तर गोरगरीब रयतेचे होते. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचे, हिंदूंचेच नव्हे, तर सर्व भारतीयांचे, जगभरातील लोकांचे प्रेरणास्थान आहे. शिवरायांनी आपल्या राज्यात कधीही भेदभाव केला नाही. त्यांनी जातिभेद केला नाही, तसेच स्त्री-पुरुष असा भेदभाव देखील केला नाही. महिलांना नेहमीच आदर, सन्मान आणि त्यांना संधी देण्याचे शिवाजीराजे उपेक्षित, गोरगरीब वर्गाबाबत अत्यंत कनवाळू होते समाजात मजूर, कष्टकरी, शेतकरी, श्रमकरी आणि विशेषतः सर्व जातिधर्मांतील महिला कायमच उपेक्षित असतात, त्यांच्याबाबत शिवाजी महाराज सहृदयी होते. शिवाजी महाराजांच्या कार्याचे, नीतिमूल्यांचे वर्णन देशी-विदेशी अभ्यासकांनी केलेले आहे. शिवाजी महाराजांच्या राज्यात आणि परराज्यातील मोहिमांमध्ये स्त्रियांना नेहमीच आदराने वागविले जाईल्. स्त्रियांना कैद करायला बंदी होती. त्यांना अत्यंत सन्मानाने वागविले जात असे. शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील व शत्रूंच्या स्त्रियांनादेखील नेहमिच मानाने वागविले जसा भाऊ बहिणीशी वागतो किंवा मुलगा आईशी वागतो, तसे शिवाजी महाराज स्त्रियांशी वागायचे. शिवरायांनी नेहमी च धर्मग्रंथ, धार्मिक स्थळे, स्त्रीया आणि लहान मुलांचा सन्मान केला. आपल्या शत्रू पक्षाच्याही महिलांचा सन्मान करावा ही उच्च कोटीची नैतिकता आहे. शिवाजीराजांच्या ठायी अशी नैतिकता होती. त्यामुळे त्यांनी स्वराज्यातील आणि परराज्यातील महिलांचे संरक्षण केले. स्त्रीसुध्दा बुध्दीमान आहे, हिंमतवान आहे, कर्तृत्ववान आहे यावर शिवरायांचा दृढ विश्वास होता. जिजाऊ साहेबांच्या सक्रिय सहभागातून हे स्पष्ट होते व शिव काळातील निर्णय प्रक्रियेत स्त्रियांनाही सहभागी करुन घेतले जात होते. शिवाजीराजांच्या महिला विषयक धोरणामुळे नंतरच्या काळात संभाजी महाराजांच्या महाराणी येसूबाई राजाराम महाराजांच्या महाराणी ताराबाई या स्वराज्याच्या रक्षणासाठी निर्भिडपणे पुढे आल्या. मुलींच्या जन्माचे स्वागत करणे त्यांना संधी देणे हे शिवकार्य आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनात अनेक जीवघेणे प्रसंग आले. पण त्यांनी नैतिकता कधीही सोडली नाही. शेतकऱ्यांचे हित हेच राज्याचे हित, हे शिवरायांचे धोरण होते. ते सामान्य शेतकऱ्यांचे हित जोपासणारे होते. आपल्या राज्यातील शेतकऱ्यांना कोणऱ्याही स्वरुपची ईजा पोहोचणार नाही याची खबरदारी शिवरायांनी घेतली. छत्रपती शिवाजी राजे अत्यंत शूर, पराक्रमी, लोक कल्याणकारी, बुध्दीमान, चैतन्यशील, जलद व उत्साही नीतिमान, चारित्र्यसंपन्न, निर्व्यसनी होते. त्यांनी अशक्य कार्य शक्य केले. अनेकशत्रुंचा पराभव केला. त्यांनी रयतेचे स्वराज्य निर्माण केले. त्यांनी खाजगी आणि सार्वजनिक जीवनात कधीही भेदभाव बाळगला नाही. आपल्या विरोधकांच्या धर्माचा, धर्मग्रंथाचा, धर्म स्थळांचा आणि महिलांचा नितांत आदर केला. शिवरायांचा इतिहास हा केवळ ढाल, तलवार आणि लढाया या पुरता मर्यादित नाही तर त्यांनीह आपल्या राज्यात सुशासन आणले. लोक कल्याणकारी राज्य हे शिवरायांचे धोरण होते. आपल्या राज्यातील प्रत्येक घटकाला न्याय मिळाला पाहिजे असे धोरण हे कटाक्षाने राबवित असत.

2 राजर्षी छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती

[Chhatrapati Shahu Maharaj National Research Fellowship (CSNRF)] : Total No. of Fellowships this year :- 146
50% Fellowships Reserved for women & 3% Reserved for Divyangjan (Persons with Disability) candidates of the Target Group

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे संपूर्ण जीवन समता, सामाजिक न्याय, बंधुत्व, एकात्मता, जातीय दुर्भावनांचा विध्वंस, इत्यादींच्या माध्यमातून मानवजातीच्या कल्याणासाठी राहीले. त्यांच्या जीवनाचा आदर्श आणि वरील तत्त्वांवर त्यांचा आयुष्यभर संघर्ष त्यांचे सत्कृत्य सर्वांना खूप प्रेरणादायी आहे. त्यांच्या संघर्ष व आदर्शांमुळे राष्ट्रप्रेम, मानवी हक्क, सामाजिक समता, न्याय, बंधुत्व, जातीय दुर्भावनांचा विध्वंस, स्वातंत्र्य, इत्यादी संदर्भात त्यांनी केलेली सत्कृत्ये व तत्वज्ञानामुळे या राज्याचीच नव्हे, तर पूर्ण जगातील मानवजात उपकृत आहे.

3 सयाजीराव गायकवाड राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती

[Sayajirao Gaikwad National Research Fellowship (SGNRF)]: Total No. of Fellowships this year :- 50
50% Fellowships Reserved for women & 3% Reserved for Divyangjan (Persons with Disability) candidates of the Target Group

सक्तीचे प्राथमिक शिक्षण, महिला सक्षमीकरण, आरोग्य संरक्षण, सार्वजनिक ग्रंथालय, जलसिंचन, रेल्वे अशा अनेक महत्त्वाच्या योजनांद्वारा सयाजीरावांनी लोककल्याणाचे काम केले. त्यांच्याबद्दल लोकमान्य टिळक म्हणत की, 'बडोदे स्वतंत्र भारताच्या कारभाराची प्रयोगशाळाच आहे. त्यांनी अनेक कलांना, कलाकारांना, विद्वानांना आश्रय दिला.' रवींद्रनाथ टागोर म्हणत, 'साहित्य, कला आणि संस्कृतीच्या जपवणुकीची दूरदृष्टी व दातृत्व सयाजीरावांत होते.' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विदेशात शिक्षणासाठी सयाजीरावांनी शिष्यवृत्ती दिली आणि पुढे एक इतिहास उभा राहिला. गुराख्यापासून एका महान राज्यकर्त्यापर्यंत त्यांचा प्रवास विस्मयजनक होता.

हिंदुस्थानवर सयाजीराव गायकवाडच नेतृत्व करू शकतील, असा ज्यांचा गौरव सुभाषचंद्र बोस यांनी केला व ज्यांच्याबद्दल स्वामी विवेकानंद म्हटले की सर्व राजांत देशाभिमान व बुद्धिमत्तेबाबत सयाजीरावांचा माझ्यावर विशेष प्रभाव आहे.

4 महात्मा जोतिराव फुले राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती

[Mahatma Jotirao Phule National Research Fellowship (JPNRF)]: Total No. of Fellowships this year :- 50
50% Fellowships Reserved for women & 3% Reserved for Divyangjan (Persons with Disability) candidates of the Target Group

महात्मा जोतिराव फुले यांचे संपूर्ण जीवन हे बुद्धिवादावर व त्या माध्यमाने सामाजिक समता, न्याय, बंधुत्व, एकात्मता, जातीय दुर्भावनांचा विध्वंस, वैज्ञानिक दृष्टिकोन, इत्यादींच्या माध्यमातून मानवजातीच्या कल्याणासाठी राहीले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शाहू यांच्या जीवनावरही महात्मा जोतिराव फुले यांच्या जीवनाचा आदर्श आणि वरील तत्त्वांवर त्यांच्या आयुष्यभर संघर्षाचा मोठा परिणाम झाला आणि महात्मा जोतिराव फुले यांचे सत्कृत्य छत्रपती शाहू व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना खूप प्रेरणादायी ठरले. महात्मा जोतिराव फुले यांच्या संघर्ष व आदर्शांमुळे व मानवी हक्क, सामाजिक समता, न्याय, बंधुत्व, स्वातंत्र्य, इत्यादी संदर्भात त्यांनी दिलेल्या तत्वज्ञानामुळे या राज्याचीच नव्हे, तर पूर्ण जगातील मानवजात उपकृत आहे.

5 कर्मवीर भाऊराव पाटील राष्ट्रीय संशोधन

[Karmvir Bhaurao Patil National Research Fellowship (KBNRF)]: Total No. of Fellowships this year :- 50
50% Fellowships Reserved for women & 3% Reserved for Divyangjan (Persons with Disability) candidates of the Target Group

महाराष्ट्रात खेडोपाडी शिक्षण पोहोचवण्याचे कार्य करणाऱ्या कर्मवीरांमधे भाऊराव पाटील यांचे नाव अग्रगण्य आहे. त्यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. याद्वारे शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गात शिक्षणाची आवड निर्माण करणे, मागासलेल्या वर्गातील गरीब मुलांना मोफत शिक्षण देणे, निरनिराळया जातिधर्मातील विद्यार्थ्यांत प्रेमभाव वाढवणे, अयोग्य रूढींना फाटा देणे, मुलांना काटकसरी, स्वावलंबी, शीलवान व उत्साही बनविणे, क्रमिक शिक्षणाबरोबरच समता, बंधुता, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी आदि मूल्यांची शिकवण विद्यार्थ्यांना देणे अशा उद्देशांना साध्य करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या कार्याच्या वटवृक्षाखाली ग्रामीण महाराष्ट्रातील अनेक पिढ्यांना आश्रय मिळाला. कर्मवीर भाऊरावांचे, संत गाडगेबाबांचे आणि डॉ. बाबासाहेबांचे जवळचे नाते होते. कर्मवीर भाऊरावांची सुरूवात शाहू महाराजांच्या वसतिगृहातून झाली. आणि त्यांनी खऱ्या अर्थाने राजर्षी शाहूंचे शिक्षणक्षेत्रातील कार्य पुढे नेले.

6 विठ्ठल रामजी शिंदे राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती

[Vitthal Ramji Shinde National Research Fellowship (VRNRF)]; Total No. of Fellowships this year :- 50
50% Fellowships Reserved for women & 3% Reserved for Divyangjan (Persons with Disability) candidates of the Target Group

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी सामाजिक, आध्यात्मिक वशैक्षणिक क्षेत्रात अनेक नवनवीन चळवळी उभ्या केल्या. अस्पृश्यतेला विरोध, स्त्री-शिक्षणाचा पुरस्कार, बुद्धासहीत अनेक परंपरांचा अभ्यास, आध्यात्मिक क्षेत्रातील सुधारक ब्राह्मो समाजाचे कार्य, शेतकऱ्यांची चळवळ, डिप्रेस्ड क्लास मिशन अशा अनेक कार्याबरोबर त्यांनी विपुल लेखनही केले. त्यांचा 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न : संशोधन आणि चिंतन' हा लेख त्यांच्या पुरोगामी विचारांची ओळख देतो. मराठा बहुनज समाजाबरोबरच मागासवर्गीयांच्या प्रश्नांना तितकेच महत्व देणारे महर्षी शिंदे अभ्यासू संशोधकही होते. त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठात धर्मांचा तौलनिक अभ्यास केला होता. त्याचबरोबर अभ्यासासाठी बंगाल, ब्रह्मदेश असा प्रवासही केला होता. महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या प्रश्नांना विधायक उपाय शोधणाऱ्या व ते कार्यान्वित आणणाऱ्या महान नेत्यांमधे महर्षी शिंदे यांचे नाव नेहमीच अग्रगण्य राहील.

7 डॉ. पंजाबराव देशमुख राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती

[Dr. Punjabrao Deshmukh National Research Fellowship (PDNRF)]: Total No. of Fellowships this year :- 50
50% Fellowships Reserved for women & 3% Reserved for Divyangjan (Persons with Disability) candidates of the Target Group

पश्चिम महाराष्ट्रात महात्मा फुलेंचा वारसा राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर चालवत असताना त्यांचा प्रयत्नांना विदर्भात चालना व बळ देण्याचे काम डॉ. पंजाबराव देशमुख यांनी केले. एकंदरित शेतकरी समाजाचा मागासलेपणाची त्यांना खोलवर जाणीव होती. तसेच मराठा, कुणबी, बहुजन शेतकरी समाज सेच मागासलेल्या जाती यांच्यात फरकापेक्षा साम्य जास्त आहे, हा विचार त्यांनी साधार मांडला. तुलनेने कमी साधने असलेल्या विदर्भात त्यांचे कार्य अधिकच प्रकर्षाने जाणवते. ते स्वतंत्रपूर्व व स्वातंत्रोत्तर काळातील ते शेतकऱ्यांचे खरेखुरे नेते होते.

8 गुरुवर्य बाबुराव गणपतराव जगताप राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती

[Guruvarya Baburao Ganpatrao Jagtap National Research Fellowship (BGNRF)]: Total No. of Fellowships this year :- 50
50% Fellowships Reserved for women & 3% Reserved for Divyangjan (Persons with Disability) candidates of the Target Group

बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड यांच्या दरबारात मोठे पद मिळत असून ही बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार व्हावा आणि अनेक अनिष्ठ प्रथा दूर व्हावा, म्हणून तरुणपणेच समाजकार्यात झोकून देणारे गुरुवर्य बाबुराव जगताप हे बहुजन चळवळीतील एक अग्रगण्य नेते होते. शिवाजी एज्युकेशन सोसायटी ते नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज अशा अनेक शिक्षण संस्थांना उभे करण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता. गुरुवर्य बाबुराव जगताप सारख्या कर्मवीरांमुळे महाराष्ट्रातील शेतकरी समाजाला काही प्रमाणात का होईना पण शिक्षणाला परिस स्पर्श झाला. विशेष म्हणजे पुण्याला विद्येचे माहेरघर बनविण्यामध्ये त्यांचे उल्लेखनीय स्थान आहे.

9 संत गाडगेबाबा राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती

[Sant Gadgebaba National Research Fellowship (GBNRF)]: Total No. of Fellowships this year :- 50
50% Fellowships Reserved for women & 3% Reserved for Divyangjan (Persons with Disability) candidates of the Target Group

सार्वजनिक स्वच्छता, व्यसनमुक्ती आणि अंधश्रद्धा निर्मूलन यांसाठी क्रांतिकारी प्रयत्न करणारे संत गाडगेबाबा यांच्या लोकअभियानाचा स्पर्श झाला नाही असा कोपरा महाराष्ट्रात नाही. समाजातील व्यसनाधीनता, अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी-परंपरा, हिंसाचार दूर करण्यासाठी आयुष्यभर प्रयत्न करणाऱ्या गाडगे बाबांचा संदेश सोपा होता - चोरी करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, देवा-धर्माच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करू नका, जातिभेद व अस्पृश्यता पाळू नका. गाडगेबाबा नुसते उपदेश देत नव्हते, तर प्रत्यक्ष काम करीत. त्यांनी गरीब, अनाथ व अपंग लोकांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली. अनेक ठिकाणी गरिबांसाठी धर्मशाळा बांधल्या, गोरगरीब जनतेसाठी छोटी-मोठी रुग्णालये बांधली. अनेक नद्यांकाठी घाट बांधले. 'महाराष्ट्रातील समाजवादाचे प्रचंड व्यासपीठ', असे आचार्य अत्रे संत गाडगेबाबांचे वर्णन करीत. बाबा त्यांच्या प्रवचनांत 'मराठा, माळी, तेली, न्हावी, धोबी, चांभार, कुंभार, कोष्टी, लोहार, बेलदार, गोड, कैकाडी, गवारी, इनकर, धनगर, मांग आणि महार' अशी बहुजन समाजातील अनेकांचा नामनिर्देश करून ते बहुजन समाजांतील कुप्रथांवर प्रहार करीत.

Fellowship for only Women candidates from Target Group

10 क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती

[Savitribai Phule National Research Fellowship (SPNRF)]: Total No. of Fellowships this year :- 25
Reserved only for WOMEN CANDIDATES of the Target Group. Out of this 3% Reserved for Divyangjan (Persons with Disability) Women candidates of the Target Group

सुमारे दीडशे वर्षापूर्वी स्त्री-पुरुष समानता व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी चळवळ उभारून तत्कालीन रूढीप्रिय समाज व्यवस्थेशी फुले दाम्पत्याने कडवी झुज दिली. एकोणविसाव्या शतकाच्या मध्यार्थात ज्या वेळी स्त्रीला बरोबरीचा दर्जा नव्हता अशा वेळी तिला शिक्षणाच्या माध्यमातून एक नवी दिशा, नव संजीवनी देण्याचे काम क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी केले. बालविवाहाला विरोध, विधवा महिलांचे केशवपन, विधवांचा पुनर्विवाह, बालहत्या प्रतिबंधक गृह स्थापणे, स्त्रीभूण हत्याविरोध, अस्पृश्यांसाठी सार्वजनिक पाण्याचे हौद खुले करणे, दिनदलितांना व अनाथांना प्रेम यासाठीच नव्हे, तर त्यांनी महात्मा जोतिराव फुले यांच्या समता, सत्यपरायणता, मानवतावाद या तत्त्वांचा अंगीकार करून जोतिबांच्या कार्यात रात्रंदिवस साथ देऊन आपले सारे आयुष्य व्यतित केले. शिक्षिका, लेखिका, कवयित्री, माता, समाजसेविका अशा विविध भूमिकांतून सावित्रीबाईंनी समाजातील गोरगरीब, दुर्बल घटकांची सेवा करीत पूर्ण आयुष्य समर्पित केले. त्यांनी केलेला त्याग, संघर्ष व जगाला दिलेल्या आदर्शामुळे संपूर्ण मानव समाज उपकृत आहे.

11 ताराबाई शिंदे राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती

[Tarabai Shinde National Research Fellowship (TSNRF)]: Total No. of Fellowships this year :- 25
Reserved only for WOMEN CANDIDATES of theTarget Group. Out of this 3% Reserved for Divyangjan (Persons with Disability) Women candidates of the Target Group

शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या ताराबाई शिंदे ह्या भारतातील आद्य-स्त्रीवादी होत. सन **1882** साली त्यांनी लिहिलेले 'स्त्री'-पुरुष समानता' ह्या पुस्तिकेतील विचार शतकानंतरही तेवढेच महत्त्वाचे व गरजेचे आहेत. ज्या काळी स्त्रीवाद (फेमिनिझम) हा शब्दही वापरात नव्हता आणि स्त्री-पुरुष समानतेबद्दल कुठलाही लक्षणीय विचारप्रवाह भारतात नव्हता, कुठलेही आंदोलन नव्हते, त्या काळात या बहुजन शेतकरी महिलेने ही पुस्तिका लिहून महिला-पुरुष तुलनात्मक अभ्यासाची जोरदार मांडणी केली. ताराबाईंनी पुरुषी वर्चस्वाला तर्कशुद्ध आव्हान दिले. त्या आपल्या काळाच्या कितीतरी पुढे होत्या. जेव्हा अनेक समाज सुधारक केवळ महिलांना मदतीची, त्यांच्या उत्थानाची चर्चा करीत होते, तेव्हा कर्तबगारीत व बुद्धिमत्तेत महिला व पुरुष हे मूलतः समान आहेत, असा सबळ दावा ताराबाईंनी केला. पुरुषप्रधान संस्कृतीच्या मूलभूत गृहितकांवरच त्यांनी प्रश्नचिह्न उभे केले. पुरुषांनी निर्माण केलेल्या अन्यायकारक सामाजिक प्रथांवर त्या तुटून पडल्या.

12 अहिल्यादेवी होळकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती

[Ahilyadevi Holkar National Research Fellowship (AHNRF)]: Total No. of Fellowships this year :- 25
Reserved only for WOMEN CANDIDATES of theTarget Group. Out of this 3% Reserved for Divyangjan (Persons with Disability) Women candidates of the Target Group

अहिल्यादेवी ही महाराष्ट्रकन्या इंदूरची राणी बनली. अहिल्यादेवींनी आपल्या संस्थानातच नाही, तर बाहेर भारतभर अनेक ठिकाणी घाट बांधले. अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला. महेश्वर व इंदूर या गावांना संपन्न-सुंदर बनवले. तेथील कारागिरांना प्रोत्साहन दिले. अनेक धर्मशाळा बांधल्या. आजची काशी उभी करण्यात महाराष्ट्राचा मोठा हात आहे. अहिल्यादेवी त्यापैकी एक प्रमुख व्यक्तीमत्त्व. अहिल्याबाई आपल्या काळाच्या पुढे होत्या. त्यांनी पडदा पद्धत पाळली नाही. त्या रोज जनतेचा दरबार भरवीत असत व लोकांची गाऱ्हाणी ऐकून घेत. एक न्यायप्रिय शासक अशी त्यांची ख्याती होती. इंदूरला मध्य प्रदेशची मुंबई म्हणतात. इंदूरच्या विकासाचे पूर्ण श्रेय अहिल्याबाईंना जाते. आजही अनेक रस्ते, किल्ले, मंदिरे, घाट, विहिरी, तलाव व धर्मशाळा त्यांच्या कार्याची ग्वाही देत आहेत. तरुणपणी विधवा झाल्यावरही त्यांनी आपल्या कर्तृत्वाने भारतीय इतिहासावर छाप टाकली.

13 बहिणाबाई चौधरी राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती

[Bahinabai Chowdhary National Research Fellowship (BCNRF)]: Total No. of Fellowships this year :- 25
Reserved only for WOMEN CANDIDATES of theTarget Group. Out of this 3% Reserved for Divyangjan (Persons with Disability) Women candidates of the Target Group

बहिणाबाईंनी कविता व ओव्यांमधून समाज व कुटुंबाला शहाणपण व व्यवहार शिकवणारे संदेश दिले आहेत. कवयित्रि बहिणाबाई चौधरी यांचा जन्म् **24** ऑगस्ट **1880** रोजीजळगाव तालुक्यातील असोदा या गावी झाला होता. बहिणाबाई या निरक्षर असल्या, तरी त्यांच्यापाशी जिवंत काव्यरचनेची निसर्गदत्त प्रतिभा होती. त्या शेतकाम आणि घरकाम करता करता उत्स्फूर्तपणे अहिराणीत ओव्या व कविता रचून गात असत. सोपानदेव चौधरी आणि त्यांचे एक आप्त् यांनी जमेल तेव्हा त्या वेळोवेळी तेथल्या तेथे उतरून घेतल्या आणि जपल्या होत्या. शेतकरीविश्वात निर्माण झालेले व ग्रामीण जीवनाचे प्रतिबिंब असणारे साहित्य सांभाळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. बदलत्या समाजरचनेत अभिजात वर्गाच्या साहित्यालाच कायम प्राधान्य देण्यात आले आहे. यामुळे जात्यावरच्या ओवीपासून औतावरच्या गाण्यापर्यंत एक मोठा सास्कृतिक वारसा आपण गमावतो की काय, अशी शंका येते. हे साहित्यविश्व आणि कलाविश्व एका संपन्न सांस्कृतिक समाजजीवनासाठी अत्यंत आवश्यक आहे. बहिणाबाईंच्या कविता ह्या वारशातील एक प्रतिभाशाली अध्याय आहेत.

Total Types of Fellowships - 13 — Total no. of Fellowships - 646

B – Fellowships for Target Group candidates from Special Category

1 खेळाडू व सर्जनशील सारथी संशोधन अधिछात्रवृत्ती [Athletic /Creative SARTHI Research Fellowship (ACSRF)]
Total No. of Fellowships this year :- 25
Reservation :- 50% Fellowships Reserved for women & 3% Reserved for Divyangjan (Persons with Disability) candidates of the Target Group

2 कैदी / कैदीची पत्नी / मुलांसाठी सारथी संशोधन अधिछात्रवृत्ती [Prisoner / Children of Prisoner / Wife of Prisoner SARTHI Research Fellowship (PSRF)]
Total No. of Fellowships this year :- 25
Reservation :- 50% Fellowships Reserved for women & 3% Reserved for Divyangjan (Persons with Disability) candidates of the Target Group

3 बाबासाहेब आंबेडकर अर्थशास्त्र राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती [Babasaheb Ambedkar Research Fellowship in Economics (BARFE)]
Total No. of Fellowships this year :- 13
Reservation :- 50% Fellowships Reserved for women & 3% Reserved for Divyangjan (Persons with Disability) candidates of the Target Group

टिप :- **1.** अधिछात्रवृत्ती ही फक्त अर्थशास्त्र या एकाच विषयासाठी असल्यामुळे संख्या मर्यादित ठेवण्यात आली आहे.
2. एक जागा दिव्यांगजनांसाठी आरक्षित आहे.

Fellowships for only Women candidates

4 मातृधार सारथी संशोधन अधिछात्रवृत्ती [Single Mother SARTHI Research Fellowship (SMSRF)]
Total No. of Fellowships this year :- 25
Reservation :- Reserved only for WOMEN CANDIDATES of the Target Group. Out of this 3% Reserved for Divyangjan (Persons with Disability) Women candidates of the Target Group

5 एकुलती एक मुलगी सारथी संशोधन अधिछात्रवृत्ती [Single Girl Child SARTHI Research Fellowship (SGCSRF)]
Total No. of Fellowships this year :- 25
Reservation :- Reserved only for WOMEN CANDIDATES of the Target Group. Out of this 3% Reserved for Divyangjan (Persons with Disability) Women candidates of the Target Group

6 कर्करोगी अविवाहीत महिला सारथी संशोधन अधिछात्रवृत्ती [Cancer Unmarried Women SARTHI Research Fellowship (UCWSRF)]
Total No. of Fellowships this year :- 25
Reservation :- Reserved only for WOMEN CANDIDATES of the Target Group. Out of this 3% Reserved for Divyangjan (Persons with Disability) Women candidates of the Target Group

7 सारथी-विधवा संशोधन अधिछात्रवृत्ती [SARTHI's Widow Research Fellowship (WSRF)]
Total No. of Fellowships this year :- 25
Reservation :- Reserved only for WOMEN CANDIDATES of the Target Group. Out of this 3% Reserved for Divyangjan (Persons with Disability) Women candidates of the Target Group

Total Types of Fellowships – 7 — Total no. of Fellowships - 163
Total Types of Fellowships (A+B) – 20 — Total no. of Fellowships – 809

उपरोक्त सर्व एम.फिल/पीएच.डी पदवीकरीता असलेली अधिछात्रवृत्ती ही यूजीसी-आरजीएनएफ या अधिछात्रवृत्तीच्या नियम व मार्गदर्शनानुसार असेल. यूजीसी-आरजीएनएफ नियम/मार्गदर्शनामध्ये या पुढे काही बदल झाल्यास, ते बदल या अधिछात्रवृत्तीला लागू पडेल.

(All the above mentioned Fellowships based on UGC-RGNF Guidelines for M.Phil/Ph.D. Any change in the UGC-RGNF Guidelines in future will be applicable to all the above Fellowships.) **Abbreviation:** UGC's-RGNF - University Grants Commission's-Rajiv Gandhi National Research Fellowship

Eligibilty :
- उपरोक्त सर्व अधिछात्रवृत्ती ही फक्त महाराष्ट्रातील लक्षित गटातील उमेदवारांकरीता लागू राहील. **(Fellowships as above are open for Target Group candidates of State of Maharashtra)**
- अर्ज भरण्याच्या तारखेच्या दिवशी उमेदवाराकडे कोणत्याही विषयामध्ये पद्युत्तर पदवी असणे आवश्यक आहे. **(The candidate should have PG degree in any stream as on the date of application.)**
- अर्ज करणाऱ्या उमेदवाराकडे एम.फिल/पि.एच डी करीता आवश्यक नोंदणी दिनांक **01.06.2018** ला किंवा त्या तारखेनंतरचे आवश्यक आहे. **(Candidate applying must have their M.Phil/Ph.D Registration on or after 1st June, 2018)**
- अर्ज करणाऱ्या उमेदवारांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.**8** लाखपेक्षा कमी असावे. **(Non-Creamy layer Income Certificate) (Family Income from all the sources should be less than Rs. 8 lakhs per annum. (Non-Creamy layer Income Certificate)**
- उमेदवार एकापेक्षा जास्त अधिछात्रवृत्तीसाठी अर्ज करु शकतो. **(Candidates are free to apply for more than one fellowship.)**
- अर्ज भरण्यापूर्वी उमेदवारांना विनंती करण्यात येते की त्यांनी या संदर्भात असलेल्या मार्गदर्शन सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात. **(Candidates are requested to go through the guidelines carefully before applying.)**

Nature of Financial Assistance for each of the above fellowship:

Fellowship in Humanities, Social Sciences, Sciences, Engineering & Technology	M.Phil	@ Rs. 25000/- p.m. for 2 years	Fellowships based on UGC- RGNF
	Ph.D	@ Rs. 25000/-p.m. for 1st & 2nd year @ Rs. 28000/- p. m. for 3rd, 4th & 5th year subject to providing upgradation certificate.	
Contingency A		@ Rs. 10000/- p.a. for initial 1st & 2nd year @ Rs. 20500/- p.a. for 3rd, 4th & 5th year	Humanities & Social Sciences
Contingency B		@ Rs. 12000/- p.a. for initial 1st & 2nd year @ Rs. 25000/- p.a. for 3rd, 4th & 5th year	Sciences, Engg. & Technology
Escorts/Reader assistance		@ Rs. 2000/- p.m. in case of physically handicapped & blind candidates	For all disciplines
HRA		As per Govt. of Maharashtra norms	For all disciplines

Above eligibility criteria are just indicative. The detailed criteria, Application form, Guidelines, Instructions etc. will be available on **https://sarthi-maharashtragov.in** after 25th March 2019.

परिपूर्ण माहिती, अर्ज, मार्गदर्शन सूचना इ. दिनांक 25 मार्च 2019 पासून **https://sarthi-maharashtragov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. कृपया तोपर्यंत संयम बाळगावा, ही कळकळीची विनंती. काही शंका असल्यास sarthiresearchfellowship@gmail.com या ईमेल वर विचारावे. आपल्याला निश्चित मार्गदर्शन मिळणार., Instructions etc. will be available on **https://sarthi-maharashtragov.in** after 25th March 2019.

Important Dates: Last date for submitting On-line Application – 30th April, 2019

Last date for submission of Hard copy of On-line filled Application form with all necessary documents – 13th May 2019

The Institute will not be responsible in case of late postal/courier delivery. It's the candidate's responsibility to see that the printed hard copy of online application form, with necessary documents reaches SARTHI office (SARTHI, Balchitravani, C T Survey 173, Gopal Ganesh Agarkar Road, Pune- 411004) on or before the mentioned date i.e. 13th May 2019

काही शंका असल्यास ह्या ईमेल वर **sarthiresearchfellowship@gmail.com** संपर्क साधावा.

Advt/Fellowships/08/03/2019

डी.आर.परिहार
व्यवस्थापकीय संचालक, सारथी